# जंतू-मित्र

जंतू म्हटले की अंगावर काटा उभा रहातो!
जंतू म्हटले की सर्दी, पडसे, टीबी, कॉलरा,
हगवण असे रोग डोळ्यासमोर उभे रहातात.

असे वाटते, जंतू म्हणजे शत्रू.
पण ते खरे नाही.

काही जंतू आपल्याला त्रास देतात.
पण सगळेच जंतू शत्रू नसतात.
काही तर आपल्याला उपयोगी पडतात.

काही जंतू आपले मित्रच आहेत.

© होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, मुंबई ४००००५
प्रकाशक: इंडियन इंस्टिट्यूट ऑफ एज्युकेशन
पुणे ४११०२९

आपण दही कसे बनवतो ?
दुधाला विरजण लावतो.
दुधात थोडे दही, नाहीतर ताक घालतो.
दुधाचे दही करणारे जंतू असतात.
ते आपले मित्र आहेत.






आपण जेवतो.
अन्न पोटात जाते.
तेथून लहान आतड्यात जाते.
तेथे जंतू असतात.
हे जंतू अन्नापासून जीवनसत्त्वे
बनवतात.
हे जंतू आपले मित्र.

जंतू सगळीकडे असतात.
हवेत, पाण्यात, जमिनीत.
जमिनीत खूप खूप जंतू असतात.
ते पिकांना क्षार पुरवतात.
जमिनीत जंतू जितके जास्त, तेवढी जमीन सुपीक!



जनावरांचे मलमूत्र, पालापाचोळा जमिनीत पुरतात.
सहा महिने तसेच ठेवतात.
कंपोस्ट खत तयार होते.
हे खत कोण तयार करते?
आपले मित्र-जंतूच!

जंतू खूप लहान असतात.
कोण काय करते दिसत नाही.
पण भिंगे वापरून पहाता येते.
जंतू पहाता येतात.

शत्रू मित्र ठरवताना घाई करू नका.
दूध नासले की वाईट वाटते.
दही बनले की बरे वाटते.
अन्न कुजले की फुकट जाते. पालापाचोळा
कुजला की खत मिळते.
दोन्ही गोष्टी जंतूच करतात.

रोगाचे जंतू थोडे आहेत.
उपयोगी जंतू खूप आहेत.